दैनिक
# इनशॉट जळगाव

संपादक : संदीप महाले

वर्ष २ अंक १५९ जळगाव मंगळवार २२ जुलै २०२५ पाने ८ किंमत ४ रुपये

पान ३ हॉटेलमध्ये नेत शाळकरी मुलीवर अत्याचार
पान ४ बसस्थानक परिसरात अनोळखीने संपविले आयुष्य !
पान ६ जमिनीच्या वादाचे सलोखा योजनेअंतर्गत यशस्वी निराकरण
पान ७ ८ किलो गांजासह दोघांना पकडले

**प्रफुल्ल लोढा आणि मंत्री गिरीश महाजन यांचे पूर्वापर घनिष्ठ संबंध असल्याचा आरोप**



# आ.खडसेंच्या विधानाने राजकारण तापले !

जळगाव ✍ प्रतिनिधी

राज्यात सध्या हनीट्रॅप प्रकरणाची सध्या जोरदार चर्चा आहे. या प्रकरणात पोलिसांनी भाजपचे नेते गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय प्रफुल्ल लोढा यांना अटक केली आहे. या प्रकरणाची सविस्तर माहिती एकनाथ खडसे यांनी दिली आहे. "प्रफुल्ल लोढा हा सात-आठ वर्षांपूर्वी एक सामान्य कार्यकर्ता होता. आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमी होता. नंतर त्याचे राजकारण्यांशी संबंध आले. त्याचे गिरीश महाजन यांच्याशी संबंध आले. नंतर तो आता 50 ते 60 कोटींचा मालक आहे, असं म्हटलं जातं. मधल्या कालखंडात प्रफुल्ल लाढो याचं गिरीश महाजन यांच्यासोबत सख्ख्य होतं. त्या कालखंडात ते बरेच दिवस एकत्र राहिले. त्यांनी एकत्र काम केलं. नंतर दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला. गिरीश महाजन यांच्यासोबत दुरावा निर्माण झाल्यानंतर प्रफुल्ल लोढा त्यांना अत्यंत खालच्या भाषेत शिवीगाळ करायला लागला. त्याचे व्हिडीओ आणि रेकॉर्डिंग देखील आहेत. इतके त्यांचे टोकाचे वाद झालेले होते", असा दावा खडसे यांनी केला."प्रफुल्ल लोढाच्या तेव्हाच्या व्हिडीओ रेकॉर्डमध्ये म्हटलेलं आहे की, पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे की, त्याला धमकी दिली जाते. तो म्हणतो मला ब्लॅकमेल करु नका. एक बटण दाबलं तर सारं उघडकीस येईल, त्याचबरोबर तुम्ही ट्रायडेंट हॉटेलला तीन महिने पाय चाटत होते, मी साऱ्या जागाला सांगेन की तुम्ही ट्रायडेंट हॉटेलला काय काय केलं", असं एकनाथ खडसे यांनी सांगितलं. "मधल्या कालखंडात इतका दुरावा झाल्यानंतर अलिकडच्या काळात प्रफुल्ल लोढा याला भाजपात प्रवेश दिला गेला. ते सुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गिरीश महाजनांचे पेढा भरवतानचे देखील फोटो आहेत. त्यावेळेस असं काय घडलं की, जो शिवीगाळ करत होता ते एकत्र आले. त्याचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रवेश झाला. तसेच लोढाची एवढी कोटी संपत्ती वाढली कशी? याचा देखील तपास व्हायला हवा", अशी मागणी खडसे यांनी केली.

**प्रफुल्ल लोढावर दोन गुन्हे**

"अंधेरी आणि साकीनाका येथील पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहे. पहिला गुन्हा अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा पोस्को अंतर्गत गुन्हा आहे. आणखी एक अश्लील फोटो काढले संदर्भातला आहे. तर दुसरा गुन्हा हा हनीट्रॅप संदर्भातला आहे. त्या गुन्ह्या संदर्भात त्याला अटक झाली. तो आता जामीनासाठी प्रयत्न करत आहे. अशा माणसाला भाजपात घेणं आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत प्रवेश देणं असे बरेचशे विषय येतात", असं खडसे म्हणाले.

**'ठाकरे सरकारमध्येही लोढाची चौकशी झाली'**

» "माझ्या माहितीप्रमाणे, प्रफुल्ल लोढाकडे अशा स्वरुपाचे काही फोटो वगैरे आहेत, अशा संशयावरुन ठाकरे सरकारच्या काळात त्याच्या घरादाराची चौकशी झाली होती. ती सीडी किंवा ते सगळं शोधण्यासाठी असेल, पण त्याच्या नंतरच्या काळात 15 दिवसांपूर्वी त्याच्या राहत्या घरी परत पोलिसांनी रेड टाकली होती. ती रेड कशासाठी टाकली हे पोलिसांच्या तपासातून बाहेर येऊ शकेल. हे प्रकरण त्या 72 अधिकाऱ्यांचं नाही. हनीट्रपिंगचा विषय वेगळा आहे. यामध्ये अनेक राजकीय व्यक्ती असण्याचा संशय आहे", असा मोठा दावा एकनाथ खडसे यांनी केला.

# साखळी बॉम्बस्फोटातील सर्व आरोपी निर्दोष



मुंबई ✍ वृत्तसंस्था

दि. 11 जुलै 2006 रोजी संध्याकाळी पश्चिम रेल्वेच्या उपनगरी लोकल गाड्यांमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांनी मुंबईसह देशाला पूर्णपणे हादरवून टाकले होते. त्या बॉम्बस्फोटांमध्ये 180 हून अधिक जणांचे प्राण गेले होते, तर कित्येक जण आयुष्यभरासाठी जायबंदी झाले. या प्रकरणात विशेष न्यायालयाने सन 2015 मध्ये पाच जणांना फाशीची, तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. मात्र आज, 19 वर्षांनंतर, सोमवार दि. 21 जुलै 2025 रोजी हे सर्व दोषी पूर्णपणे निर्दोष ठरल्याने राज्य सरकार आणि महाराष्ट्र एटीएसला मोठी चपराक बसली आहे.

माटुंगा रोड, माहीम जंक्शन, वांद्रे, सांताक्रूझ, जोगेश्वरी, बोरिवली आणि भाईंदर या ठिकाणी संध्याकाळी 6. 24 ते 6. 42 वाजताच्या दरम्यान हे बॉम्बस्फोट झाले होते. या बॉम्बस्फोटांमध्ये 189 जण मृत्युमुखी पडले, तर 700 हून अधिक जण जखमी झाले. या सर्व दोषींनी त्यांना ठोठावण्यात आलेल्या शिक्षेविरोधात अपिले केली होती. तर राज्य सरकारने पाच जणांच्या फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब होण्यासाठी याचिका केली होती. याविषयीच्या अंतिम सुनावणीअंती राखून ठेवलेला निर्णय न्यायमूर्ती अनिल किलोर व न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने सोमवारी सकाळी जाहीर करताना, सर्वांनाच निर्दोष मुक्त केले. या 12 पैकी एकाचा तुरुंगवासातच मृत्यू झाला. मात्र, सर्व पुरावे लक्षात घेता त्यालाही निर्दोष ठरवण्यात येत असल्याचे खंडपीठाने (उर्वरित पान २ वर.. )

# कृषिमंत्र्यांचे मंत्रिपद धोक्यात? 'पक्ष कठोर निर्णय घेईल'

मुंबई ✍ वृत्तसंस्था

राज्यातील महायुती सरकारमधील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानसभेत ऑनलाइन रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने आणि शेतकऱ्यांबाबतच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे त्यांचे मंत्रिपद धोक्यात आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी धाराशिव येथे छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी भेटीनंतर कोकाटे यांच्या वर्तनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

"शेतकरी संकटात असताना कृषीमंत्र्यांचे असे वर्तन अयोग्य आहे. पक्ष त्यांच्याबाबत योग्य निर्णय घेईल," असे सूचक वक्तव्य तटकरे यांनी केले आहे. सुनील तटकरे यांच्या या विधानाने कोकाटे यांच्या मंत्रिपदावर टांगती तलवार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

माणिकराव कोकाटे यांचा विधानपरिषदेत ऑनलाइन रमी खेळतानाचा व्हिडीओ शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी X वर शेअर केला. या व्हिडीओने राज्यभर खळबळ माजवली, (उर्वरित पान २ वर.. )

**प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंचा कडक इशारा !**



**स्पष्टीकरणही चुकीचे : तटकरे**

» सुनील तटकरे यांनी धाराशिव येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना कोकाटे यांच्या वर्तनाला "अयोग्य" ठरवले. ते म्हणाले, "शेतकरी संकटात असताना कृषीमंत्र्यांनी संवेदनशीलपणे आणि जबाबदारीने वागायला हवे. कोकाटे यांनी यापूर्वीही शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त वक्तव्ये केली आहेत, ज्याबाबत अजित पवारांनी त्यांना समज दिली होती. रमी खेळण्याच्या व्हिडीओवरील त्यांचे स्पष्टीकरणही चुकीचे आहे. पक्ष या प्रकरणाची गंभीर दखल घेईल आणि योग्य निर्णय घेईल.

# संपादकीय

## जगातील लोकसंख्येत घट- वाढ?

पाश्चात्य देशांतला प्रजननदर सातत्याने घसरत आहे. अमेरिकेतील आकडेवारी तर खूप बोलकी आहे. तेथे आज प्रजननदर 1.6 आहे. हा दर लोकसंख्या टिकवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक असलेल्या 2.1 दरापेक्षा फार कमी आहे. याचा अर्थ असा की आज अमेरिकाAयुरोपसमोर लोकसंख्या घटणे ही फार मोठी समस्या आहे. तसं पाहिलं तर ही समस्या जपानलासुद्धा भेडसावत आहे. जपान आणि चीन हे आशिया खंडातले महत्त्वाचे देश. कालपरवापर्यंत यांची लोकसंख्या वाढत होती. आता दोन्ही देशांत लोकसंख्या घटायला लागली आहे. यातही भारताला चीनची खास दखल घ्यावी लागते. कालपरवापर्यंत लोकसंख्येबद्दल चीन आपल्या पुढे होता. आता तशी स्थिती राहिली नाही. 2024 सालची जी आकडेवारी उपलब्ध झाली आहे त्यानुसार चीनमध्ये लग्न करणाऱ्यांची संख्या झपाट्याने घटत आहे. एकेकाळी चीन सरकार 'कुटुंब नियोजन करा' म्हणून विविध कार्यक्रम राबवत असे. आता चीन सरकार तरूण पिढीने लग्न करावं, मुलं होऊ द्यावी, यासाठी योजना राबवत आहे.

आधुनिक अर्थशास्त्र सांगतं की आर्थिक प्रगती झाली की लोकांना मजा करण्यासाठी अधिकाधिक वेळ हवा असतो. म्हणून त्यांना मुलं नकोशी वाटतात. मुलं झाली की त्यांच्या संगोपनात वेळ आणि पैसा जातो. त्यापेक्षा एकच अपत्य असावं. म्हणजे मग स्वतःचं जीवन जगायला वेळ आणि पैसा उपलब्ध असेल. ही वस्तुस्थिती मागच्या शतकात युरोपA अमेरिकेत होती. आशियातील दोन मोठे आणि प्राचीन संस्कृती असलेले देश म्हणजे भारत आणि चीन. भारत 1947 साली स्वतंत्र झाला तेव्हा आपली लोकसंख्या सुमारे 34 कोटी होती. चीनमध्ये माओची क्रांती 1949 साली यशस्वी झाली तेव्हा चीनची लोकसंख्या 54 कोटी होती. त्यानंतर भारत आणि चीन यांची लोकसंख्या सतत वाढतच गेली. 2000 साली चीनची लोकसंख्या होती 130 कोटी. हा आकडा 2025 साली 142 कोटी झाला. भारताची लोकसंख्या 2000 साली 106 कोटी होती तर 2025 साली लोकसंख्या 146 कोटी आहे. म्हणजे आता आपलीलोकसंख्या चीनच्या लोकसंख्येपेक्षा चार कोटीने जास्त आहे!

चीनने लोकसंख्या काबूत आणली असली तरी आता मात्र लोकसंख्या वाढवण्यासाठी शासकीय पातळीवरून खास प्रयत्न सुरू झालेले आहेत. असा प्रकार आशियातील आणखी एक महत्त्वाचा देश जपानबद्दलही घडत आहे. 1950 साली जपानची लोकसंख्या 8.4 कोटी होती. ही लोकसंख्या 2000 साली 12.7 कोटी झाली. आता 2025 साली ही लोकसंख्या घटली असून 12.31 कोटी आहे. म्हणजे चीनप्रमाणेच जपानची लोकसंख्यासुद्धा घटत आहे. जपानच्या समस्येच्या नेमकी विरुद्ध समस्या भारतासमोर गेली अनेक वर्षे आहे. ती म्हणजे सतत वाढत जाणारी लोकसंख्या. एका अंदाजानुसार भारतात दररोज सुमारे पन्नास हजार मुलं जन्माला येतात. 1947 ते 2021 एवढ्या 74 वर्षांत भारताची लोकसंख्या शंभर कोटीने वाढली आहे. देशाची लोकसंख्या आणि त्याचे देशाच्या एकूण प्रगतीवर होणारे परिणाम याची जगाला जाणीव करून देण्याचे श्रेय ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ थॉमस माल्थस यांना दिले जाते.

आज ही परिस्थिती फक्त जपानची आहे, असं मात्र नाही. युरोपातील अनेक देशांची लोकसंख्या घटत आहे. अशा देशांना आता 'ज्येष्ठ नागरिकांचा देश' असं म्हटलं जात आहे. ही स्थिती फार भयानक आहे. जर देशात नवी मुलं जन्माला येणार नसतील तर देशाच्या आर्थिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो. देशात जर नव्या रक्ताचे तरूण नसतील तर उत्पादन प्रक्रियेवर त्याचा परिणाम होतो. आज युरोपातील अनेक देश आणि जपानची हीच स्थिती झालेली आहे.

आजच्या तरूण पिढीला लग्न करण्याची इच्छा नाही, ते सरळ 'लिव्हइन' हा पर्याय स्वीकारतात. चुकून कोणी लग्न केलं तर ते दाम्पत्य मुलं होऊ देत नाही. अशा स्थितीत देशाची लोकसंख्या कमी कमी होत जाणं हे अगदी स्वाभाविक आहे.

## 'श्रद्धा जीवनाचे मूलतत्त्व!' - प.पू.डॉ. सुप्रभाजी म.सा

विद्यार्थी, व्यावसायिक व्यक्तींना उज्वल भविष्य घडविण्यासाठी पंचतत्व किंवा पाच नियमांचे पालन केले पाहिजे. श्रद्धाशील, सहनशील, विचारशील, कर्मशील व चारित्र्यशील अश्या विवेकपूर्ण आचारणाने आपले व्यक्तिमत्त्व घडते. श्रद्धा हे प्रत्येक मनुष्याचे जीवनाचे मूळ तत्व आहे. श्रद्धाशील मनुष्यालाच ज्ञानप्राप्त होते. श्रद्धा असेल तरच सिद्धी प्राप्त होते. सहनशीलता ही 'मलम' समान असते तर श्रद्धा ही 'कवच' प्रमाणे काम करते. दुसऱ्याला आनंद देण्यातून मनाला शांती प्राप्त होईल, असे विवेकशील विचार ठेवले पाहिजे. अधिकार सांगण्यापेक्षा कर्तव्याचे पालन करुन कर्मशील राहिले पाहिजे. 'ज्यांना कर्तव्याची जाण झाली त्यांनाच जीवन समजते.' 'चारित्र्यशील होण्यासाठी सदाचार महत्त्वाचा आहे.' असा प्रेरक संदेश राजस्थान प्रवर्तिनी श्रमणीसूर्या प.पू.डॉ.सुप्रभाजी म.सा. यांनी आजच्या धर्मसभेत श्रावक-श्राविकांना दिला.

मनुष्याच्या जीवनशैलीमध्ये फास्ट फूड, जंक फूड यांचे वाढत असलेल्या प्रमाणावर प. पू. डॉ. हेमप्रभाजी म. सा. यांनी विस्तृत भाष्य केले. भोजनासाठी जगणे, जगण्यासाठी भोजन करणे, जीवन जगण्यासाठी आहार करणे... या तीन प्रकारात मनुष्य भोजन करतो. ज्ञान, दर्शन, चारित्र्य... आराधनेचे साधन शरीर आहे, ते चालविण्यासाठी आहार आवश्यक आहे. मोक्षप्राप्तीचे लक्ष्य गाठण्यासाठी शरिराला धर्मसाधनेसाठी प्रवृत्त करा. "उत्तम आहार : शाकाहार" असून मनुष्य जीवन सार्थकी लावण्यासाठी तो केला पाहिजे. स्वस्थ, तंदुरूस्त राहण्यासाठी, ज्ञानवृद्धीसाठी फास्ट फूड आधरित जीवनशैली थांबविली पाहिजे. केव्हा, कुठे आणि कसे भोजन केले पाहिजे, या संदर्भातील ज्ञानवर्धक निरूपण करण्यात आले.

**स्वाध्याय भवन, जळगाव**
**शब्दांकन - देवेंद्र पाटील**

## २५ कोटी गरीब लोक गरिबीतून बाहेर पंतप्रधान मोदींचा दावा

नाशिक/ वृत्तसंस्था

आजपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिवेशनाच्या सुरुवातीला 'देशातील २५ कोटी गरीब लोक गरिबीतून बाहेर आल्याचा आणि महागाईचा दर सुमारे दोन टक्क्यांपर्यंत घसरल्याचा,' दावा केला आहे. जगाने भारतीय सैन्याची ताकद पाहिली असल्याचे सांगत त्यांनी ऑपरेशन सिंदूरचे कौतुकही केले.

पावसाळी अधिवेशनापूर्वी संसदेबाहेर माध्यमांशी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, संपूर्ण जगाने भारताच्या लष्करी सामर्थ्याचे, भारतीय सैन्याच्या ताकदीचे रूप पाहिले आहे. भारतीय सैन्याने ठरवलेले १०० टक्के लक्ष्य साध्य केले. शत्रूच्या घरात घुसून, दहशतवादी अड्डे २२ मिनिटांत उद्ध्वस्त केले. संपूर्ण जगाने मेक इन इंडियाची शक्ती पाहिली आहे. जेव्हा जेव्हा मी परदेशातील सहकाऱ्यांना भेटतो तेव्हा त्याचे कौतुक केले जाते. जेव्हा या अधिवेशनादरम्यान सभागृह विजयोत्सवाच्या भावनेने एका आवाजात व्यक्त करेल, तेव्हा भारताची लष्करी शक्ती मजबूत होईल. देशाला प्रेरणा मिळेल आणि लष्करी क्षेत्रात केल्या जाणाऱ्या कामालाही चालना मिळेल. मेक इन इंडियाला चालना मिळेल. यामुळे तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे मोदी म्हणाले.

देशातील २५ कोटी गरीब लोक गरिबीतून बाहेर आल्याचा दावा पंतप्रधान मोदी यांनी केला आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०१४ पूर्वी देशात असा एक काळ होता जेव्हा महागाईचा दर दोन अंकी होता. आज, हा दर सुमारे दोन टक्क्यांपर्यंत घसरल्याने, देशातील सामान्य लोकांच्या जीवनात एक दिलासा मिळाला आहे. २५ कोटी गरीब लोक गरिबीतून बाहेर आले आहेत, ज्याचे जगातील अनेक संस्था कौतुक करत आहेत."

(पान १ वरून )

### साखळी बॉम्बस्फोटातील....

जाहीर केले. तसेच 'या सर्वांना दोषी ठरवून शिक्षा देणारा 2015 मधील निर्णय रद्दबातल करण्यात येत असून तुरुंगांमध्ये असलेल्या सर्व 11 दोषींना (अन्य कोणत्या गुन्ह्यात ते नको असल्यास) तात्काळ सोडण्यात यावे, असा आदेशही खंडपीठाने दिला. दहशतवादी घटनांच्या प्रकरणांत तपास संस्थांकडून धार्मिकदृष्ट्या भेदभाव करून तपास केला जातो. निष्पाप व्यक्तींना आरोपी करून तुरुंगात टाकले जाते. कालांतराने सबळ पुराव्यांअभावी ते निर्दोष सुटतात. परंतु, तोपर्यंत त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची वर्षे वाया गेलेली असतात, अशा स्वरुपाचा युक्तिवाद दोषींच्या वकिलांनी केला होता. हायकोर्टाच्या या निर्णयाने तो युक्तिवाद खरा ठरला. या प्रकरणात महाराष्ट्र एटीएसने आरोपींकडून बळजबरीने कबुलीजबाब मिळवले, हा आरोप सिद्ध करण्यात बचाव पक्षाचे वकील यशस्वी ठरले आहेत. सरकारी पक्षाने गुन्हा सिद्ध करण्यासाठी कनिष्ठ कोर्टात सादर केलेल्या अनेक साक्षीदारांच्या साक्षी या विश्वासार्ह नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या आरोपींविरोधातील गुन्हा निर्विवादपणे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरले आहे. अशा परिस्थितीत या सर्व दोषींना निर्दोष ठरवून त्यांना तुरुंगातून सोडण्याचा आदेश देण्यात येत आहे, असे खंडपीठाने आपल्या निर्णयात शेवटी स्पष्ट केले.

### कृषिमंत्र्यांचे मंत्रिपद धोक्यात?...

विशेषतः शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आणि कृषी संकटाचा मुद्दा चर्चेत असताना. रोहित पवार यांनी कोकाटे यांच्यावर टीका करताना म्हटले, "राज्यात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असताना कृषीमंत्री रमी खेळण्यात व्यस्त आहेत.

महायुती सरकार शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरले आहे." यानंतर, शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली, तर शिवसेना(उद्धव ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी दावा केला की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कोकाटे यांच्यासह चार मंत्र्यांना कॅबिनेटमधून हटवण्याचा निर्णय घेतला आहे.

कोकाटे यांनी आपल्या बचावात सांगितले की, ते विधानपरिषदेत तहकूबीनंतर खालच्या सभागृहाचे कामकाज युट्यूबवर पाहण्याचा प्रयत्न करत होते, तेव्हा 'जंगली रमी'ची जाहिरात समोर आली, जी त्यांनी दोन-तीन सेकंदांत स्किप केली. "हा व्हिडीओ जाणीवपूर्वक निवडकपणे शेअर करून माझी बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. मी कोणताही खेळ खेळलो नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. तटकरे यांनी लातूरमधील मारहाणीच्या घटनेबाबतही नाराजी व्यक्त केली. २० जुलै रोजी लातूर येथे तटकरे यांच्या पत्रकार परिषदेदरम्यान छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करत पत्ते फेकले होते. यानंतर, सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना मारहाण केली. तटकरे यांनी याबाबत म्हटले, "छावा संघटनेने शेतकऱ्यांच्या भावना व्यक्त केल्या, ज्या आम्ही शांतपणे ऐकायला हव्या होत्या. सूरज चव्हाण यांचे वर्तनही चुकीचे होते. अजित पवार यांनी त्यांना दिल्लीला बोलावले असून, त्यांच्याबाबतही निर्णय होईल."

# शासनाने तीन महिन्यांची मुदतवाढ द्यावी : अनिल अडकमोल

## जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन सादर

जळगाव प्रतिनिधी

जळगाव जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना आज दि.२१ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आ.) महानगरअध्यक्ष अनिल अडकमोल यांनी सततच्या सर्व्हर प्रॉब्लेममुळे मोफत धान्य वाटप तसेच ई-केवायसी करण्यास अडचण शासनाने तीन महिन्यांची मुदतवाढ द्यावी यासाठी निवेदन सादर केले आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाची जिल्हा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात येते की, शासनाच्या अन्न नागरी व पुरवठा विभागाने माहे जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्याच्या धान्य वाटपास तसेच शिधापत्रिका धारकाच्या प्रायेक माणसाची ई-केवायसी करण्याकरिता ३१ जुलै २०२५ पर्यंत शेवटची मुदत दिली असून, नाही केली तर मोफत धान्याचा लाभ मिळणार नाही, असे म्हणणे आहे, तर दुसरीकडे मात्र सततच्या सव्र्हर प्राब्लेममुळे ई पॉस मशिन वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे मोफत धान्य वाटपास शासनाने ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढीव मुदतवाढ द्यावी, तसेच अत्योदय शिधापत्रिका धारकांना गेल्या वर्षभरापासून सवलतीच्या दरात मिळणारी एक किलों साखर ही बंद करण्यात आली असून येत्या काही दिवसात सण उत्सव ची सुरवात होणार आहे त्यामुळे लाभार्थ्यांना साखर सुद्धा पूर्ववत सुरू करावी, तसेच शिधापत्रिका धारकांच्या घरातील प्रत्येकांची ई-केवायसी योजना हि निरंतर सुरु ठेवावी सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहे. सर्वसामान्य ग्रामिण भागातील कामगार कष्टकरी महिला या आपले काम घंटे बुढवून तासन तास रेशन



दुकानावर उने राहत आहेत व स्वस्त धान्य दुकानदारांशी नाराजी व्यक्तकरीत आहे व अखेरीस रेशन दुकानावर चकरा मारून वापस जात आहेत. त्यामुळे शासनाने सर्व्हर प्राब्लेमला येणारी अडचण सोडवून ई-पॉस मशिन सुरळीत सुरू केली तर प्रत्येक शिधापत्रिका धारकांना वेळेवर धान्य मिळून शासनाच्या योजनेचे उद्दिष्ट सफल होण्यास मदत होईल, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महानगर अध्यक्ष अनिल अडकमोल यांच्या नेतृत्वाखाली निवेदनाद्वारे केली. याप्रसंगी प्रताप बनसोडे, किरण अडकमोल, नरेंद्र मोरे, मिलिंद अडकमोल, अरुण बनसोडे, गौतम सोनवणे यांची उपस्थित होती.

## धावत्या रेल्वेखाली ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू

भडगाव प्रतिनिधी

रेल्वेरूळ ओलांडताना झालेल्या दुर्घटनेत रेल्वेखाली आल्यामुळे ३० वर्षीय तालुक्यातील कजगाव येथील तरुणाचा अकस्मात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी दि. २० रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी चाळीसगाव लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

योगेश शामराव पाटील (वय ३०, रा. कजगाव ता. भडगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे.त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुलं असा परिवार आहे. व्हॅन चालवून तो परिवाराचा उदरनिर्वाह करीत होता.दि. २० जुलै रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास कजगाव जवळीलच श्री चक्रधर स्वामी रेल्वेलाईन वरून धावणाऱ्या गोवा एक्सप्रेस या रेल्वेखाली योगेश पाटील आल्याची माहिती पाचोरा जंक्शन वरून मेमोद्वारे चाळीसगाव लोहमार्ग पोलिसांना मिळाली. चाळीसगाव लोहमार्ग पोलीस स्टेशनचे कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करत मृतदेह चाळीसगाव येथील सरकारी रुग्णालयात नेला होता. या प्रकरणी चाळीसगाव लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेमुळे भडगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे.

## उद्धव ठाकरे गटाने केला गृहराज्य, कृषी अन् जलसंपदा मंत्र्यांचा निषेध !

जळगाव प्रतिनिधी

राज्यातील गृहराज्यमंत्री, कृषीमंत्री आणि जलसंपदामंत्री यांनी शेतकरी व जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केले. या आंदोलनात तीन मंत्र्यांच्या प्रतिमांचा निषेध नोंदवत बॅनरला चुना लावून संताप व्यक्त करण्यात आला.

सोमवार (दि. २१ जुलै) रोजी दुपारी १ वाजता झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व उपजिल्हाप्रमुख प्रा. भाऊसाहेब सोनवणे यांनी केले. महायुती सरकारमधील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे (अजित पवार गट), गृहराज्यमंत्री योगेश कदम (शिंदे गट) आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला. या तिन्ही मंत्र्यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.




शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांनी आरोप केला की, रोज महाराष्ट्रात ८ शेतकरी आत्महत्या करीत असताना कृषीमंत्री विधानभवनात 'ऑनलाईन जंगली रम्मी' खेळत आहेत. गृहराज्यमंत्री कदम यांच्या आईच्या नावे डान्सबार चालवला जात असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच भाजप नेते प्रफुल्ल लोढा यांच्यावर हनी ट्रॅप आणि पॉक्सो अंतर्गत झालेल्या अटकेबाबतही सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. आंदोलनाप्रसंगी तालुका अध्यक्ष प्रमोद घुगे, अशोक आप्पा सोनवणे, किरण ठाकूर, प्रभाकर कोळी, धनराज वारडे, रघुनाथ सोनवणे, स्वप्नील पाटील, खुशाल पाटील, राजू पाटील, अनिल बोरसे, नितीन चौधरी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# हॉटेलमध्ये नेत शाळकरी मुलीवर अत्याचार

जळगाव प्रतिनिधी

तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या १३ वर्षीय शाळकरी मुलीवर एका मुलाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पोटदुखीच्या कारणास्तव सरकारी रुग्णालयात गेले असता अत्याचारातून ती मुलगी पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे दिसून आले आहे. हा प्रकार समोर येताच तिच्या आई-वडिलांना मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणी 'सोनू' नावाच्या मुलावर पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, पारोळा तालुक्यातील एका गावात १३ वर्षीय मुलगी पालकांसोबत राहते. गेल्या काही दिवसांपासून पीडित मुलीला पोटदुखीचा त्रास होत होता. त्यामुळे तिला जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.तिथे डॉक्टरांनी तिची तपासणी केली असता, ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे धक्कादायक सत्य समोर आले. यावेळी पालकांना मोठा धक्का बसला. तर मुलीला विश्वासात घेऊन याबाबत विचारले असता तिने माहिती दिली. पीडित मुलगी व तिची मैत्रीण हि बसस्थानकावर शाळा सुटल्यावर जायचे. तेथे दि. १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत, पीडित मुलगी पारोळा येथील शाळेतून घरी येत असताना, तिची पारोळा बसस्थानकावर 'सोनू' नावाच्या एका मुलासोबत ओळख झाली.

या ओळखीचा फायदा घेत त्याने पीडित मुलीला आपल्या दुचाकीवर बसवून हॉटेलमध्ये अनेकवेळा नेले आणि तिथे तिच्यावर एका खोलीत बलात्कार केला.या बलात्कारातूनच मुलगी गर्भवती राहिल्याचे दिसून आले. या गंभीर घटनेने हादरलेल्या पीडित मुलीच्या आईने तात्काळ पारोळा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यानुसार, 'सोनू' (पूर्ण नाव व गाव माहीत नाही) याच्यावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश महाजन हे करत आहेत. या घटनेमुळे तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## लाडक्या बहिण योजनेवर मंत्री भुजबळ यांचे मोठे विधान

नाशिक वृत्तसंस्था

राज्यातील महायुती सरकारची लाडकी बहिण योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेविषयी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी एक मोठे विधान केले आहे. भुजबळ म्हणाले, ज्यांच्याकडे गाड्या, बंगले आहेत, त्यांच्यासाठी ही योजना नाही. ही योजना गरिबांसाठी आहे, श्रीमंतांसाठी नाही. नाशिक जिल्ह्यातील लासलगावमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना छगन भुजबळ बोलत होते.

# कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच असणार !

## मंत्री गिरीश महाजन यांनी केला मोठा दावा

नाशिक वृत्तसंस्था

राज्यातील महायुती सरकारमध्ये नाशिकच्या पालकमंत्री पदाचा अद्याप तिढा सुटलेला नसताना मंत्री गिरीश महाजन यांनी मोठा दावा केला आहे. गिरीश महाजन म्हणाले, नाशिकचा पालकमंत्री कोणीही होवो, कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच असणार, असा दावा त्यांनी केला आहे. नाशिक येथे पुढील वर्षापासून सिंहस्थ कुंभमेळा पार पडणार असून त्या पार्श्वभूमीवर महाजन यांनी हे विधान केले आहे.

मंत्री गिरीश महाजन यांची कुंभमेळा मंत्री म्हणून नियुक्ती देखील करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली कुंभमेळ्याची तयारी देखील सुरू आहे. परंतु, अद्याप नाशिकच्या पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नसून शिवसेना शिंदे गटाचे दादा भुसे पालकमंत्री पदासाठी आग्रही आहेत. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील माणिकराव कोकाटे आणि छगन भुजबळ देखील पालकमंत्री पदाच्या शर्यतीत आहेत.

गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना नाशिक पालकमंत्रीपदाचा निर्णय लवकरच होईल. मात्र, तो निर्णय काहीही असला तरी कुंभमेळ्याची जबाबदारी माझ्यावरच आहे, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

नाशिक महापालिकेने सुमारे 15 हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा सादर केला आहे. याशिवाय, इतर नऊ विभागांनी मिळून सुमारे 9 हजार कोटी रुपयांचे स्वतंत्र आराखडे सादर केले आहेत. यामुळे एकूण 24 हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार झाला आहे. मात्र, या आराखड्याला अद्याप राज्य सरकारची मंजुरी मिळालेली नाही, तसेच राज्याच्या



अर्थसंकल्पातही यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमध्ये येत्या कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला होता. या वेळी त्यांनी सुमारे 2 हजार कोटी रुपयांच्या विकासकामांसाठी निविदा काढण्यात आल्याचे जाहीर केले. महापालिकेने गोदावरी, वालदेवी आणि नंदिनी या नद्यांवरील पाच नव्या पुलांसह इतर काही पुलांच्या कामांसाठी निविदा काढल्या आहेत. तसेच, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये प्राधिकरण स्थापन करण्याच्या कायद्याला मंजुरी देण्यात आली होती. या नव्या प्राधिकरणाची जबाबदारी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

## विजेचा शॉक लागून तरुण मजुराचा दुर्दैवी मृत्यू !

अमळनेर प्रतिनिधी

इमारत बांधकामच्या पाचव्या मजल्यावर काम करीत असताना विजेचा शॉक लागून तरुण मजूरचा मृत्यू झाल्याची घटना अमळनेर येथील चोपडा रस्त्यावरील गजानन महाराज मंदिराजवळ शनिवारी सकाळी ११ वाजता घडली.

मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील सुधामपूर येथील रहिवासी विनायक नानू उईके (वय २०) हा शनिवारी सकाळी पाचव्या मजल्यावर काम करत असताना त्याला विजेचा शॉक लागला. त्यात त्याचा मृत्यू झाला. सेंट्रिंग ठेकेदार हिरालाल बाबुराव गांगुर्डे यांच्याकडे तो कामाला होता. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर इमारत मालकाचे नाव निष्पन्न न झाल्याने पोलिसानी त्यांचा शोध घेऊन गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होत आहे.

## भावकीचा वाद : चुलत भावाने केला १० वर्षीय मुलाचा खून : सोलापूर जिल्हा हादरला !

सोलापूर वृत्तसंस्था

माढा तालुक्यातील अरण येथील पाच दिवसांपासून बेपत्ता असलेल्या कार्तिक बळीराम खंडाळे (वय 10) याचा खून त्याचा चुलत भाऊ संदेश सहदेव खंडाळे (वय 38) याने केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्यास चार दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. भावकीच्या वादातून ही घटना घडल्याची माहिती पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी दिली.

सविस्तर वृत्त असे कि, शनिवारी सकाळी जाधववाडी (ता. माढा) शिवारात बेपत्ता कार्तिक खंडाळे याचा कॅनॉलमध्ये कुजलेल्या अवस्थेत मृतदेह मिळून आला होता. त्याचा निर्घृण खून झाल्याचे समोर आले. या ठिकाणी श्वान पथक, ठसेतज्ञ, फॉरेन्सिक लॅब पथक यांनी भेट दिली होती. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेने अवघा जिल्हा हादरून गेला आहे. त्याचा निर्घृण खून कोणी व कशासाठी केला, याची चर्चा होत होती. तसेच आरोपीस तत्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत होती.

गुन्हा दाखल होताच सोलापूर येथील गुन्हे शाखा व टेंभुर्णी पोलिसांची पाच पथके तपास करीत होती. शनिवारी सकाळी त्याचा मृतदेह जाधववाडी शिवारात कॅनॉलमध्ये मिळून आला. तेथे दुर्गंधी पसरली होती. मृतदेहाशेजारी दोन चाकू, मोजे व रक्त लागलेला दगड मिळून आला होता. या ठिकाणी सोलापूर येथील श्वान पथक, फॉरेन्सिक लॅब पथक यांनी भेट दिली होती. त्याचे सोलापूर येथे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर अरण येथे शनिवारी रात्री शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर , उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा अजित पाटील, बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप, टेंभुर्णी पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी कामगीरी पार पाडली.

## मोठ्या माशाला वाचवण्यासाठी लहान माशाचा बळी

### सूरज चव्हाणच्या राजीनाम्यावर रोहिणी खडसेंचा हल्लाबोल !

लातूर वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्याने राजीनामा द्यावा लागला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना राजीनामा देण्याचे आदेश दिले. यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी जोरदार टीका करत अजित पवारांवर निशाणा साधला आहे.

हा वाद कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधिमंडळात मोबाईलवर रम्मी खेळतानाच्या व्हिडीओमुळे सुरू झाला. हा व्हिडीओ रोहित पवार यांनी सोशल मीडियावर शेअर केला होता. यावरून संतप्त झालेल्या छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी लातूरमध्ये राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत पत्ते उधळून निषेध व्यक्त केला. यानंतर सूरज चव्हाण आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. या



घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने विरोधकांनी राष्ट्रवादीवर टीकास्त्र सोडले.

रोहिणी खडसे यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले, "सूरज चव्हाणचा राजीनामा स्वागतार्ह आहे, पण अजित पवारांनी मोठ्या माशाला वाचवण्यासाठी लहान माशाचा बळी देऊ नये. माणिकराव कोकाटे यांचाही राजीनामा घ्यावा." त्यांनी कोकाटेंवर शेतकऱ्यांचा अवमान केल्याचा आरोप केला. दरम्यान, शिंदे गटाचे प्रवक्ते योगेश केदार यांनीही सूरज चव्हाणला इशारा देत, "आधी मारायचे आणि मग दिलगिरी व्यक्त करायची ही अनीती चालणार नाही," असे म्हटले आहे.

## सुनील तटकरेंनीच हल्ला घडवून आणला : जरांगे पाटील

लातूर वृत्तसंस्था

राज्यातील लातूरमध्ये छावा संघटनेचे नेते विजयकुमार पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या बेदम मारहाणीच्या घटनेने राज्यात खळबळ उडवली आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुनील तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला, असे मनोज जरांगे म्हणालेत.

दैनिक इनशॉट जळगाव हे वृत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक संदिप प्रकाश महाले यांनी परेश प्रिंटर्स, डी.८७, गोपाल दाल मिल, एमआयडीसी, जळगाव- ४२५००२ येथून प्रसिध्द केले. संपादक - संदीप प्रकाश महाले (TITLE CODE - MAHMAR 52556)
Daily Inshot Jalgaon Printed, published and Owned by sandeep prakash mahale, and printed at Paresh printed at D-87 gopal dal mill, Midc Jalgaon- 425002.Editor - sandeep prakash mahale - (TITLE CODE - MAHMAR 52556)

# साने गुरुजींच्या विचारांनी प्रेरित कार्यकर्त्यांची रेडिओ मनभावनला प्रेरणादायी भेट !

## अमरावती विभागातील साने गुरुजींच्या विचारांनी प्रेरित कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने दिली भेट

जळगाव प्रतिनिधी

अमरावती विभागातील साने गुरुजींच्या विचारांनी प्रेरित कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने जळगाव येथील के.सी.ई. सोसायटीच्या एम.जे. महाविद्यालयामधील रेडिओ मनभावन (90.8 FM) या सामुदायिक रेडिओ केंद्राला प्रेरणादायी भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण व आदिवासी भागातील युवक-युवतींसाठी चालवले जाणारे सामाजिक व लोकोपयोगी कार्यक्रम प्रत्यक्ष पाहणे आणि त्यातून शिकणे.

के.सी.ई. सोसायटीचे अध्यक्ष श्री. नंदकुमार बेंडाळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून साकारलेला 'रेडिओ मनभावन' हा सामुदायिक रेडिओ केंद्र केवळ जळगावच नव्हे तर संपूर्ण खानदेशातील श्रोत्यांसाठी एक प्रभावी संवादमाध्यम ठरला आहे.

या वेळी केंद्राचे संचालक श्री. अमोल देशमुख यांनी सर्व पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी रेडिओ मनभावन केंद्राची कार्यपद्धती, 24 तास ऑनलाईन प्रसारणाची वैशिष्ट्ये, देश-विदेशातील श्रोत्यांशी असलेली संवाद प्रक्रिया, आणि विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. या रेडिओ केंद्राचे कार्य केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता, शिक्षण, आरोग्य, महिला सबलीकरण, आदिवासी विकास व युवक मार्गदर्शन यांसारख्या विविध क्षेत्रात भरीव योगदान देणारे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या भेटीमध्ये विशेष उपस्थिती लाभली ती प्राचार्य राजाभाऊ महाजन यांची, जे साने गुरुजींच्या प्रत्यक्ष सान्निध्यात आले होते. ते मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (एम. जे. कॉलेज)चे 1955 च्या बॅचचे माजी विद्यार्थी असून, शिक्षण, समाजसेवा आणि मूल्याधारित जीवनासाठी ते परिचित आहेत. तब्बल सात दशकांपूर्वी त्यांनी याच महाविद्यालयातून शिक्षण घेतले होते, आणि आज पुन्हा एकदा त्यांनी या परिसराला भेट दिली हे दृश्य अत्यंत भावूक आणि प्रेरणादायी ठरले. च्या सोबत एकूण 22 सदस्य सहभागी झाले होते. यामध्ये प्राचार्य दिलीपराव काळे, प्रा. डॉ. शांताराम चव्हाण, प्रा. डॉ. भारत कल्याणकर, प्रा. डॉ. मुकेश सरदार, गोपाळराव कोरडे, सुभाषराव सगणे, विठ्ठलराव ठाकरे, आकाश देशमुख, अनिल च-हाटे यांचा समावेश होता. तसेच मुर्तिजापूर येथून प्रा. सुधाकर गौरखेडे, प्रा. डॉ. मनीषा यादव, प्रा. मीना गावंडे यांसह स्त्रिया आणि युवक-युवतींचाही सहभाग होता.

स्त्री प्रतिनिधींमध्ये सौ. स्मिता चव्हाण, सौ. अर्चना कल्याणकर, सौ. संगीता काळे, सौ. संध्या ठाकरे,



आयुष्मती संगीता सदार व ममता गवई यांचा समावेश होता. युवकांमध्ये शाहू कल्याणकर (अमरावती), आनंद वानखडे (वरुड) व इंद्रायणी यादव (मुर्तिजापूर) यांनी उत्साहाने सहभाग घेतला. याप्रसंगी रेडिओ मनभावनच्या टीमकडून आर. जे. शुभांगी, संदीप केदार, साहिल गायकवाड आदी उपस्थित होते. त्यांनी पाहुण्यांना रेडिओ केंद्राचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात मोलाची भूमिका बजावली. या सर्व मान्यवरांनी रेडिओ मनभावनच्या उपक्रमांचे मनःपूर्वक कौतुक केले आणि केंद्राच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. साने गुरुजींच्या विचारांची प्रेरणा घेऊन सुरू असलेला हा संवाद आणि समन्वय निश्चितच ग्रामीण व युवा विकासासाठी प्रभावी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला

# जळगावात आज संत नामदेव महाराजांचा संजीवन समाधी पालखी सोहळा!

जळगाव प्रतिनिधी

श्री क्षत्रिय अहिर शिंदे समाज येथे वर्धक संस्था संचलित युवक व महिला मंडळ तसेच सहयोगी संस्था यांच्या विद्यमाने दिनांक 22 जुलै मंगळवार रोजी राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या 675 वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या आनंदमय व उत्सवात साजरा करण्यात येणार असून सर्वप्रथम सकाळी साडेआठ वाजता शिंपी समाजाच्या श्रीमती मनोरमाबाई जगताप सामाजिक सभागृह येथील संत नामदेव महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक व पूजन मान्यवरांच्या हस्ते होईल यानंतर पालखी सोहळ्याला भव्य टाळा मृदुंग गजरात पालखी सोहळा सुरुवात होईल.

पंधरा पाच चौक मारुती पेठ रामपेठ सराफ बाजार सुभाष चौक पुष्प लता बेंडाळे यानंतर गुरुद्वारा येथे शेख बांधवांतर्फे पालखीचे स्वागत करून पुढे दुपारी बारा वाजता पालखी लिव्हा सरदार वल्लभभाई पटेल भुवन बीएसएनएल ऑफिसच्या मागे समारोप होईल या ठिकाणी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येईल व महाप्रसादाचा लाभ देण्यात येईल. गेल्या एक महिन्यापासून संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुमार सोनवणे उपाध्यक्ष विवेक जगताप सचिव अनिल खैरनार कोषाध्यक्ष चेतन खैरनार सहसचिव दीपक जगताप प्रसिद्धीप्रमुख मनोज भांडारकर वस्तीग्रह प्रमुख दिलीप सोनवणे युवक अध्यक्ष जितेंद्र शिंपी महिला अध्यक्ष रेखाताई निकम सदस्य गणेश सोनवणे सुरेश सोनवणे या असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते शहरातील प्रत्येक विभागात जाऊन समाज बांधवांना कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका देत आहे तरी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्य करण्याच्या वतीने करण्यात आलेले आहे

## बसस्थानक परिसरात अनोळखीने संपविले आयुष्य !

पारोळा पारोळा

शहरातील बस स्थानकाच्या आवारात पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना दि. १९ रोजी पहाटेच्या सुमारास घडली. शहरातील बस स्थानक परिसरामध्ये असलेल्या लिंबाच्या झाडाला कोणीतरी अज्ञात इसमाने साधारण (वय-३०) याने सुती दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना पहाटे सहा वाजेच्या सुमारास पेपर विक्रेता निंबा मराठे यांच्या लक्षात आले. याबाबत घटनास्थळी चौकशी केली असता मयताजवळ कुठल्याही प्रकारचे आय कार्ड अथवा रहिवासी पत्ता सापडला नव्हता, रात्री उशिरापर्यंत मयताची ओळख पटलेली नव्हती,

## लंम्पी प्रतिबंधासाठी जिल्ह्यात उपाययोजना सुरु – उप आयुक्त डॉ. झोड यांच्याकडून क्षेत्रीय पाहणी

जळगाव प्रतिनिधी

एरंडोल, धरणगाव व पारोळा तालुक्यांमध्ये गायींमध्ये आढळून आलेल्या लम्पी स्किन डिजीज (लंम्पी) च्या किरकोळ प्रकरणांमुळे पशुसंवर्धन विभाग सतर्क झाला असून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

उप आयुक्त, पशुसंवर्धन, डॉ. प्रदीप झोड यांनी काल एरंडोल, धरणगाव, पारोळा या तालुक्यात आढळून आल्याने तिन्ही तालुक्यांचा दौरा करून बाधित क्षेत्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक पशुपालकांशी



संवाद साधून रोगाचे गांभीर्य पटवून दिले आणि खालील बाबींची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले

रुग्ण जनावरांचे विलगीकरण, योग्य निगा, स्वच्छता व व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक उपाययोजना व वेळोवेळी मार्गदर्शन, स्थानिक पशुवैद्यकीय यंत्रणेशी समन्वय साधणे, डॉ. झोड यांनी अधिकाऱ्यांना लंम्पीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तत्काळ उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## कंडारीत वृध्दाचा संशयास्पद मृत्यू

जळगाव प्रतिनिधी

जळगाव तालुक्यातील कंडारी येथील रहिवाशी असलेले ७४ वर्षीय वृद्धाने हजाम टेकडी परिसरातील वाघुर नदीजवळ एका झाडाला गळफास घेतल्याचे दिसून आले. हा प्रकार शनिवारी १९ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता समोर आली. दरम्यान संशयास्पद मृत्यू झाल्याची चर्चा परिसरात होत असल्याचे दिसून आले. याबाबत नशिराबाद पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

भिमराव रामदास परदेशी (वय ७४, रा. कंडारी, ता.जि. जळगाव) असे मयत झालेल्या वृध्दाचे नाव आहे.

भिमराव परदेशी हे आपल्या पत्नी, मुले, सुना व नातवंडे यांच्या सोबत जळगाव तालुक्यातील कंडारी गावात वास्तव्याला होतो. शनिवारी १९ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास भिमराव परदेशी यांनी वाघूर धरणाजवळील हजाम टेकडी येथील एका झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. हा प्रकार गावात राहणारा हर्षल बाविस्कर या तरूणाला समजले. त्याने तातडीने नशिराबाद पोलीसांना घटनेची माहिती दिली.

# मद्यधुंद तरुणाने केला मंत्री शिरसाट यांच्या घरावर हल्लाचा प्रयत्न

## सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल ; सुपुत्र सिद्धांत यांच्या गाडीवर करण्यात आली होती दगडफेक

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकारचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या येथील निवासस्थानी एका तरुणाने हल्ला केल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात मंत्री संजय शिरसाट यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याशी संपर्क झाला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सौरभ घुले असे आरोपी तरुणाचे नाव आहे. हा तरुण रविवारी मध्यरात्री मंत्री संजय शिरसाट यांच्या येथील निवासस्थानालगत आला. त्यावेळी तो मद्यधुंद अवस्थेत होता. त्याने त्याच स्थितीत शिरसाट यांच्या बंगल्याच्या दिशेने दगडफेक केली. यावेळी त्याने शिवीगाळही केली. सदर तरुणाने हे कृत्य का केले? हे समजले नाही. पण त्याने हा प्रकार दारुच्या नशेत केला असावा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच सातारा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सदर तरुणास ताब्यात घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल केला. पोलिस पुढील तपास करत आहेत.

यापूर्वी गत नोव्हेंबर महिन्यात



विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत एका अज्ञात व्यक्तीने संजय शिरसाट यांचे सुपुत्र सिद्धांत शिरसाट यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली होती. त्यात त्यांच्या गाडीची काच फुटली होती. मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना ही घटना घडली होती. त्यामुळे एकच खळबळ माजली होती.

उल्लेखनीय बाब म्हणजे संजय शिरसाट सध्या एका व्हिडिओमुळे वादात सापडलेत. या व्हिडिओत ते आपल्या बेडरुममध्ये पलंगावर बनियनवर बसल्याचे दिसून येत आहेत. त्यांच्या शेजारी पैशाने भरलेली बॅगही दिसून येत आहे. या प्रकरणी विरोधकांनी टीकेची झोड उठवल्यानंतर त्यांनी सदर बॅग पैशांची नव्हे तर कपड्यांची असल्याचा दावा केला. ते म्हणाले, तो व्हिडिओ माझ्या बेडरूममधीलच आहे. मी प्रवासातून आल्यानंतर बेडवर बसल्याचे दिसून येत आहे. तिथे माझा श्वान घुटमळत आहे. माझी कपड्यांची बॅगही तिथे आहे. त्याची बातमी होते. याचे मला आश्चर्य वाटते. आमच्याकडे मातोश्री व मातोश्री -2 नाही. माझे घर माझ्या मतदारसंघातील प्रत्येकासाठी उघडे असते. कार्यकर्ते येतात. उत्साहाच्या भरात त्यांच्यापैकी एखाद्याने हा व्हिडिओ काढला असेल. माझ्या घरात चिठ्ठी देऊन कुणालाही बोलावले जात नाही. काम काय, नाव काय, या गोष्टी विचारल्या जात नाहीत. आम्हाला शिवसेना प्रमुखांनी शिकवले आहे की, तुम्ही कार्यकर्ता म्हणून राहा, नेता व्हायचा प्रयत्न करू नका. त्यानुसार, आजही आम्ही त्याच भूमिकेत आहोत, असे ते म्हणाले.

# विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याचे आवाहन

यावल प्रतिनिधी

राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ जळगाव जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना वेळेवर मिळावा यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, यावल यांच्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे.

महाडीबीटी (MahaDBT) या ऑनलाइन पोर्टलद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया ३० जून २०२५ पासून सुरू झाली आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी तातडीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन निवेदनात करण्यात आले आहे.

सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षातील अनुक्रमे १४७ व ५३९ शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असून, हे सर्व अर्ज २५ जुलै २०२५ पूर्वी शासननिर्णयाच्या अधीन राहून निकाली काढावेत, असे निर्देश प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिले आहेत. याशिवाय, मागील शैक्षणिक वर्षांमध्ये अर्ज न करता राहिलेल्या विद्यार्थ्यांनी देखील ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज सादर करून प्रक्रिया पूर्ण करावी, असेही सांगण्यात आले आहे.

शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात जमा केली जाते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक आहे की नाही, याची खातरजमा करून घ्यावी. अन्यथा शिष्यवृत्तीच्या वाटपात अडचणी येऊ शकतात.

प्रकल्प अधिकाऱ्यांनी सर्व महाविद्यालयांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या स्तरावरून व्यापक जनजागृती करावी. सोशल मीडिया, सूचना फलक, बैठका व इतर माध्यमातून प्रचार करून अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत व त्यांना योजनांचा वेळेवर लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करावेत.

# रागाच्या भरात बापाने केला मुलाचा खून !

पुणे वृत्तसंस्था

फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या वडकी येथील वलवा वस्ती परिसरात कौटुंबिक वादातून एका ३५ वर्षीय तरुणाचा वडिलांकडून खून झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात वडिलांवर भारतीय न्याय संहिते अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मनोहर ताबाजी डोके (३६ ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या मेव्हण्याचा खून झाल्याप्रकरणी त्यांनी सासऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास कैलास नगर, वलवा वस्ती येथील राहत्या घरी त्यांचे सासरे सुरेश बाबुराव जमदाडे (५९) यांनी मुलगा प्रशांत सुरेश जमदाडे (३५) यास शिवीगाळ करत गंभीर मारहाण केली.

या वादात प्रशांतला जमिनीवर पाडून गमजाच्या सहाय्याने गळा दाबून आणि डोकं जमिनीवर आपटून ठार मारले. घटनेची माहिती मिळताच उपायुक्त सोमय मुंडे, सहायक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ निरीक्षक अमोल मोरे, पोलीस निरीक्षक संजय पतंगे दाखल झाले होते. त्यांनी आरोपीस ताब्यात घेतले. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नानासाहेब जाधव हे करत आहेत. आरोपी आणि मृत हे दोघेही मजुरी काम करतात. आरोपीच्या पत्नीला अर्धांगवायूचा झटका आल्याने मागील दोन वर्षे त्या घरीच आहे. मृत प्रशांत नेहमी मद्यपान करुन घरच्यांना त्रास देत होता. यामुळे घरात नेहमीच वाद होत होते. रविवारी रात्रीही वाद झाल्यावर रागाच्या भरात वडिलांनी मुलाचा खून केला.

# राज्यात हनी ट्रॅप ? ४ मंत्री-४ खासदार अडकले


## संजय राऊतांच्या ट्विटने खळबळ !

मुंबई वृत्तसंस्था

गेल्या काही महिन्यापासून राज्यातील महायुती सरकारमधील मंत्री वादग्रस्त विधानासह काही घटनेमुळे चर्चेत येत असतांना आता राज्याच्या राजकारणात हनी ट्रॅप प्रकरणाने पुन्हा एकदा खळबळ माजवली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी X वर एक खळबळजनक दावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. फडणवीस यांनी विधानसभेत "राज्यात हनी ट्रॅपचा कोणताही प्रकार नाही" असा दावा केला होता, पण राऊतांनी भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांचा प्रफुल्ल लोढा यांच्यासोबतचा फोटो शेअर करत CBI चौकशीची मागणी केली आहे. संजय राऊत यांनी या प्रकरणात चार मंत्र्यांसह चार तरुण खासदारांचा समावेश असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

काय आहे प्रकरण ?

नाशिकमधील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये कथित हनी ट्रॅप रॅकेटद्वारे ७२ हून अधिक व्यक्ती, यामध्ये वरिष्ठ IAS, IPS अधिकारी, माजी आणि विद्यमान मंत्री, तसेच काही राजकीय नेते अडकल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणात प्रफुल्ल लोढा नावाच्या व्यक्तीवर अल्पवयीन मुलींवर अत्याचार आणि हनी ट्रॅपचे गंभीर आरोप आहेत. लोढा हा गिरीश महाजन यांचा निकटवर्तीय आणि विश्वासू कार्यकर्ता असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते एकनाथ खडसे यांनी केला आहे. या प्रकरणात संवेदनशील व्हिडीओ रेकॉर्ड झाल्याचा दावा एका महिलेने केला असून, ठाणे क्राइम ब्रांचला तीन तक्रारी प्राप्त झाल्या



आहेत, ज्याची गोपनीय तपासणी सुरु आहे. काँग्रेस नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत एक पेन ड्राइव्ह दाखवत यात ७२ IAS अधिकारी आणि माजी मंत्र्यांचा समावेश असल्याचा दावा केला होता. याशिवाय, संजय राऊत यांनी X वर शेअर केलेल्या पोस्टमध्ये गिरीश महाजन यांच्यासोबत प्रफुल्ल लोढा यांचा फोटो शेअर करत "दुध का दुध, पानी का पानी" होण्यासाठी CBI चौकशीची मागणी केली आहे.

# जमिनीच्या वादाचे सलोखा योजनेअंतर्गत यशस्वी निराकरण

## २५ वर्षांचा वाद मिटवून शेतकऱ्यांना दिलासा

जळगाव प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या *'सलोखा योजने'* अंतर्गत, जामनेर तालुक्यातील मौजे पाहूर येथील २५ वर्षांपासून सुरू असलेला जमिनीचा वाद यशस्वीपणे सोडवण्यात आला आहे. गट क्रमांक २३ व १९ च्या अदलाबदलीने संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरील हक्काबाबत स्पष्टता मिळाली असून दीर्घकाळ चाललेला कब्जाचा वाद कायमस्वरूपी मिटवण्यात आला आहे.

या प्रकरणात श्री. विजय बळीराम पांढरे, अभय बळीराम पांढरे, गणेश वसंतराव पांढरे, सुमनबाई वसंतराव पांढरे आणि सूर्यकांत रामराव देशमुख या शेतकऱ्यांचा समावेश होता. सलोखा योजने अंतर्गत तलाठ्यांनी पंचनाम्याद्वारे सुरुवात करून अहवाल तहसीलदार जामनेर यांच्याकडे सादर केला. त्यानंतर दुय्यम निबंधक, पहूर यांना सूचित करून अदलाबदल दस्ताची नोंदणी करण्यात आली.

शासन निर्णय दिनांक ३ जानेवारी २०२३ व ७ एप्रिल २०२५ नुसार अंमलात आलेली सलोखा योजना ही मालकी हक्क, सीमेविवाद, नोंद विसंगती, अतिक्रमण आणि वडिलोपार्जित मालमत्तेविषयक वाद अशा विषयांवर परस्पर सहमतीने तडजोड करण्यास प्रोत्साहन देते. या योजनेअंतर्गत केवळ ₹१,००० नोंदणी शुल्क व ₹१,००० मुद्रांक शुल्क आकारले जाते.तहसीलदार, जामनेर यांनी संबंधित शेतकऱ्यांना नोंदणीकृत दस्तऐवजाचे प्रती प्रदान करून या यशस्वी



प्रक्रियेसाठी तहसील कार्यालय, महसूल विभाग व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. हे प्रकरण सलोखा योजनेच्या प्रभावीतेचे व सामाजिक सलोख्याच्या वृद्धीचे उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे.

# भरधाव ट्रॅव्हल्सने दिली ट्रकला धडक ; दोन्ही वाहनांचे नुकसान

जळगाव प्रतिनिधी

औद्योगिक वसाहत परिसरातून मुख्य रस्त्याला लागणाऱ्या ट्रकला जळगावकडे येणाऱ्या ट्रॅव्हल्सने धडक देऊन ती विरुद्ध दिशेला जाऊन काँक्रीटच्या गटारीवर धडकली. यामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. सुदैवाने अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही. हा अपघात रविवारी दि. २० रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास रेमंड कंपनीच्या मागील बाजूकडे असलेल्या रस्त्यावर झाला.

सविस्तर वृत्त असे कि, औद्योगिक व साहत परिसरातील एसएस ९ सेक्टरकडून एक मालवाहू ट्रक मुख्य रस्त्यावर येत असताना गाडेगावकडून येणाऱ्या खासगी कंपनीची ट्रॅव्हल्स ट्रकच्या चालकाकडील बाजूला कॅबीनवर धडकली. या धडकेवेळी ट्रॅव्हल्स चालकाने एकदम ब्रेक दाबल्याने ही ट्रॅव्हल्स विरुद्ध बाजूच्या रस्त्याकडे जाऊन काँक्रीटच्या गटारीवर धडकली. यामध्ये ट्रॅव्हल्सचे काच फुटून समोरील बाजू चक्काचूर झाली. तसेच ट्रकच्या कॅबिनचेही नुकसान झाले. अपघानानंतर ट्रक चालकाने ट्रक रस्त्याच्या बाजूला लावून क्लिनरसह तो पसार झाला.

ट्रॅव्हल्स विरुद्ध दिशेला गेली त्या वेळी त्या रस्त्यावर एकही वाहन नव्हते. अन्यथा वाहने असते तर मोठा अनर्थ झाला असता, अशी माहिती प्रत्यक्षदर्शी जयेश पाटील, विशाल राजपूत यांनी दिली. अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स गाडेगाव येथील खासगी कंपनीतून कामगारांना ने-आण करणारी आहे. अपघातानंतर ट्रॅव्हल्समधील कामगारांना दुसऱ्या ट्रॅव्हल्समध्ये पाठविण्यात आले.

# १७ वर्षीय मुलाला शिवीगाळ करीत जबर मारहाण !

जळगाव प्रतिनिधी

आपल्याकडे पाहून बोलत असल्याच्या संशयावरून १७ वर्षीय मुलाला शिवीगाळ व मारहाण करून गंभीर दुखापत केल्याची धक्कादायक घटना रात्री ९.३० वाजता तांबापूरा येथे घडली आहे. याबाबत शनिवारी १९ जुलै रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आशाबाई मधुकर शेटे (वय ४२) या महिला तांबापूरा या भागात आपल्या मुलासह वास्तव्याला आहेत. शुक्रवारी १८ जुलै रोजी रात्री ९.३० वाजता महिलेचा मुलगा चेतन मधुकर शेटे आणि नणंद दुर्गाबाई बाळू शिंदे हे दोघेजण बोलत होते. यावेळी आपल्याकडून पाहून बोलत असल्याचे संशय घेवून तांबापूरा भागात राहणारे भुऱ्या, अरबाज यूनूस तडवी आणि इतर अनोळखी २ मुले यांनी मुलगा चेतन शेटे याला मारहाण केली. मुलाला मारहाण करत असल्याचे पाहून त्याची आई आशाबाई आणि दुर्गाबाई यांनी धाव घेतली. त्यावेळी दोघांना धमकी दिली.

हा प्रकार घडल्यानंतर आशाबाई शेटे यांनी एमआयडीसी पोलीसात याबाबत तक्रार दिली. त्यानुसार शनिवारी मध्यरात्री एमआयडीसी पोलीस ठाण्यात भुऱ्या, अरबाज यूनूस तडवी आणि इतर अनोळखी २ मुले यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ रामदास कुंभार हे करीत आहे

# मुले पळविण्याच्या संशयाने दोघांना जबर मारहाण ; संशयित निघाले जडीबुडी विकणारे

जळगाव प्रतिनिधी

रावेर तालुक्यातील सावदा येथून जवळ असलेल्या मुंजलवाडी, कुसुंबा आणि लोहारा येथे जडीबुटी विकणाऱ्या हरियाणातील दोन जणांना ते मुले पळवणारे असल्याच्या संशयातून बेदम मारहाण करण्यात आल्याचे समजत आहे.

सविस्तर वृत्त असे कि, हरियाणातून जडी-बुटी घेऊन काही जण रावेर तालुक्यात आले आहेत. यातील जस्सानाथ पुनुनाथ (वय ६०) आणि मोनूनाथ जस्सानाथ (वय २०, दोन्ही रा. सिरसा, हरियाणा) हे दि.२० रोजी सकाळी रावेर तालुक्यातील मुंजलवाडी येथे आले होते. त्यांनी गावातील एका व्यक्तीला नसा दुखत असल्याच्या व्याधीची तपासणी केली. यानंतर तो व्यक्ती घरी जाऊन इतर लोकांना घेऊन आला. हे दोन व्यक्ती मुले पळवणाऱ्या टोळीतील असल्याच्या गैरसमजातून त्यांना या लोकांनी मारहाण सुरू केली. यामुळे या दोन्ही जणांनी त्यांच्याकडे असलेल्या एचआर १३ ई ६५१६ क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून पलायन केले. यानंतर हे दोन्ही जण प्रचंड वेगाने मुंजलवाडी सोडून कुसुंब्याकडे पळाले. तेथे लोकांनी त्यांना अडवून पुन्हा मारहाण केली यानंतर तेथून आपला जीव वाचवून ते वेगाने पळाले असताना त्यांचा एका व्यक्तीला कट लागला. यानंतर परिसरातील लोकांनी लोहारा येथे या दोन्ही जणांना गाठून त्यांना पुन्हा मारले. तसेच त्यांच्या चारचाकी वाहनाची तोडफोड देखील करण्यात आली असल्याची समजते.

दरम्यान, सावदा पोलीस स्थानकातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतल्याने या दोन जणांची सुटका झाली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तर सावदा पोलीस स्थानकात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यातील पहिला गुन्हा हा इकबाल मोहंमद तडवी यांनी दाखल केला असून, त्यांना या दोन्ही जडिबुटी विकणाऱ्याच्या गाडीचा कट लागल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. दुसरी तक्रार ही जडीबुटी विकणाऱ्यांच्या वतीने केल्याने त्यांना मारहाण करणाऱ्यांना अज्ञात व्यक्तींना आरोपी करण्यात असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणाचा तपास स.पो.नी. विशाल पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सावदा पोलीस करीत आहेत.

# तोतया तिकीट निरीक्षकाला अटक!

भुसावळ प्रतिनिधी

भुसावळ रेल्वे विभाकडून विशेष पथक दामिनीकडून तोतया तिकीट निरीक्षकाला अटक करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. मुंबईकडे जात असलेल्या काशी एक्स्प्रेसमध्ये भुसावळ ते मनमाड दरम्यान शुक्रवारी दामिनी पथकाकडून नियमित तपासणी केली जात होती. या तपासणीत हा तोतया तिकीट निरीक्षक हा चक्क प्रवाशांकडील तिकिटांची तपासणी करतांना आढळून आला होता. त्याला दामिनी पथकाने मनमाड रेल्वे सुरक्षा बलाच्या सुपूर्द केले. भुसावळ रेल्वे विभागात अंतर्गत असलेले दामिनी पथक शुक्रवारी नियमित तपासणी करीत होते.

## थोडक्यात

### दोन दुचाकीचा भीषण अपघात : दोन मित्र गंभीर जखमी !

जळगाव : प्रतिनिधी

शहरातील मआयडीसीतील सुमेरसिंग ढाबा येथे भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने दुसऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दोन मित्र गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी १८ जुलै रोजी दुपारी ४ वाजता समोर आली आहे. याप्रकरणी शनीवारी १९ जुलै रोजी रात्री ८ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, शहरातील एमआयडीसी परिसरात सुमेरसिंग ढाबा येथून मोहम्मद अजेर अनवर शेख वय २९ रा. फातेमा नगर आणि त्याचा मित्र कडू पिंजारी हे दोघे शुक्रवारी १८ जुलै रोजी दुपारी ४ वाजता दुचाकी क्रमांक (एमएच ०५ बीबी ४६५९) ने जात असतांना समोरू येणारी दुचाकी क्रमांक (एमएच १९ ईएन ६३०६) ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत मोहम्मत अजेर आणि कडू पिंजारी हे दोघे गंभीर जखमी झाले. हा अपघात झाल्यानंतर समोरील अज्ञात दुचाकीधारक हा घटनास्थळ येथू पळून गेला.

### वेळोवेळी अत्याचारातून अल्पवयीन मुलगी पाच महिन्याची गर्भवती !

जळगाव- शहरातील शनीपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर वेळोवेळी केलेल्या अत्याचारातून गर्भवती राहिल्याची धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शनीवारी १९ जुलै रोजी रात्री १० वाजता शनीपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयित आरोपीला अटक करण्यात आली आहे. शनीपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही आपल्या कुटूंबियांसह वास्तव्याला आहे. मागील एक वर्षांपासून निखील लिलाधर कोळी (वय २०) या नराधमाने पिडीत मुलीला लग्नाचे आमिष दाखवत तिच्या वेळोवेळी अत्याचार करण्यात आला. या अत्याचारातून पिडीत मुलगी ही पाच महिन्याची गर्भवती असल्याचे १८ जुलै रोजी उघडकीला आले. या संदर्भात पिडीत मुलीच्या आईने शनीपेठ पोलीस ठाण्यात धाव घेवून तक्रार दिली आहे. त्यानुसार शनीवारी १९ जुलै रोजी रात्री १० वाजता संशयित आरोपी निखील कोळी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

# तरुणांचा पाठलाग करून ८ किलो गांजासह दोघांना पकडले

## चोपडा तालुक्यात गलंगीपासून शहरापर्यंत घडली घटना

जळगाव प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) चोपडा तालुक्यात गोपनीय माहितीवरून गांजासह २ लाख ६२ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल २ तरुणांचा पाठलाग करून ताब्यात घेतला आहे. यामुळे गांजाची विक्री उघडकीस आली आहे.संशयित आरोपींची नावे उदयभान संजय पाटील (वय २१ वर्ष, रा.चांग्या निमजवळ,अडावद) व योगेश रामचंद्र महाजन (वय २१ वर्ष, रा.खालचा माळीवाडा, अडावद) अशी आहेत.

जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थांची तस्करी आणि वाढते सेवन रोखण्यासाठी जळगाव पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर (चाळीसगाव) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आण्णासाहेब घोलप (चोपडा) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, जळगावचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी विशेष सूचना दिल्या होत्या. दि. २० जुलै रोजी रात्री ८.३०



वाजता स्थानिक गुन्हे शाखेचे पोहवा रवींद्र अभिमन पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन व्यक्ती काळ्या रंगाच्या बजाज पल्सर मोटरसायकलवरून गलंगी गावाकडून चोपडा शहराकडे बेकायदेशीरपणे गांजासदृश अंमली पदार्थाची वाहतूक करत आहेत. या माहितीच्या आधारे पोहवा विष्णू बिऱ्हाडे, रवींद्र पाटील आणि दीपक माळी यांनी गलंगी गावात पाळत ठेवली.

आरोपींना पोलिसांची चाहूल लागताच त्यांनी चोपडा शहराकडे वेगाने पलायन केले. पोहवा विष्णू बिऱ्हाडे, रवी पाटील आणि दीपक माळी यांनी त्यांचा पाठलाग सुरु केला. आरोपींचा वेग जास्त असल्याने पोलीस पथकाने ही माहिती पोउपनिरी जितेंद्र वल्टे यांना दिली. पोउपनिरी जितेंद्र वल्टे यांनी विलेश सोनवणे आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने चोपडा शहरात नाकाबंदी लावली. आरोपींना पकडण्याचा प्रयत्न करत असताना मोटरसायकलवर मागे बसलेला इसम उडी मारून पळून गेला. पोउपनिरी जितेंद्र वल्टे यांनी सुमारे १५० ते २०० मीटर धावत त्याचा पाठलाग करून त्याला पळून जाण्याची संधी न देता शिताफीने ताब्यात घेतले.

या कारवाईत ९० हजार रुपये किंमतीची एक बजाज पल्सर काळ्या रंगाची (एमएच १८ बीडब्ल्यू ८०३५) मोटरसायकल, १,२१,९५०/- रुपये किंमतीचा ८.१३० कि.ग्रॅ. वजनाचा गांजा आणि ५१,०००/- रुपये किंमतीचे ०२ मोबाईल असा एकूण २,६२,९५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. (केसीएन)चोपडा शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास चोपडा शहर पोलीस स्टेशन करत आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील (स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव), पोलीस निरीक्षक मधुकर साळवे, सहायक पोलीस निरीक्षक एकनाथ भिसे (चोपडा शहर पोलीस स्टेशन), पोउपनिरी जितेंद्र वल्टे, पोहवा विष्णू बिऱ्हाडे, रवी पाटील, दीपक माळी, विलेश सोनवणे, चालक दीपक चौधरी (सर्व स्थानिक गुन्हे शाखा जळगाव), पोकॉ मदन पावरा, महेंद्र पाटील, अतुल मोरे (चोपडा शहर पोलीस स्टेशन) यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# रात्री महाविद्यालयातून लांबविले एक लाख रुपये

जळगाव प्रतिनिधी

रात्रीच्या वेळी महाविद्यालयाचे प्रवेशद्वार उघडून चोरट्यांनी रोख एक लाख रुपयांसह सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा एनव्हीआर असा एकूण एक लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना १८ जुलै रोजी मध्यरात्री गोदावरी आयएमआर लेखापाल विभागात घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे कि, १८ जुलै रोजी गोदावरी आयएमआर महाविद्यालयाचे सर्व विभाग व मुख्य प्रवेशद्वार बंद करून अधिकारी, कर्मचारी घरी निघून गेले. त्यानंतर चोरट्यांनी मुख्य प्रवेशद्वार उघडून व आतील लेखापाल विभागाचा दरवाजा उघडून विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे जमा झालेले एक लाख रुपये टेबलाचे काउंटर व कपाटातून लांबविले. चोरट्यांनी रोकड शोधताना कार्यालयातील फाईल व इतर दस्ताऐवज फेकले. तसेच कपाट, काउंटरचे नुकसान केले. आयएमआर महाविद्यालयाच्या लेखापाल विभागासह याच परिसरात असलेल्या गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएससी स्कूलच्या लेखापाल विभागातही कपाट व इतर साहित्य अस्ताव्यस्त फेकून दिले. चोरीची ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. एक जण बाहेर उभा राहून लक्ष ठेवत होता तर दोन जण आतमध्ये चोरी करीत होते. सर्वांनी तोंडाला रुमाल बांधलेला होता. चोरट्यांनी रोकड तर लांबविलीच शिवाय तोडफोड करून मोठे नुकसानही केले.

### तरुण महिलेवर अत्याचार !

चाळीसगाव प्रतिनिधी

तालुक्यातील एका गावात महिला घरी एकटी असताना व कामकाज करीत असताना एका नराधमाने घरात घुसून तिच्यावर बलात्कार केला. याप्रकरणी मेहुणबारे पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील एका गावात शुक्रवारी दि. १८ जुलै रोजी सकाळी ९ वाजता ३७ वर्षीय महिला हि घरात एकटी होती. घरातील कामे करीत असताना संशयित आरोपीने महिलेला जबरदस्ती करून तिच्यावर बलात्कार केला.

**कोकाटेंच्या ‘त्या’ व्हिडीओवरुन महाविकास आघाडीचे आंदोलन**

# काय दुर्दैव शेतकऱ्यांचं... कृषीमंत्रीच खेळतायत रमी !

धरणगांव प्रतिनिधी

विधिमंडळात रमी खेळणाऱ्या कृषिमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा तसेच शेतकरी पुत्रांना अमानुष मारहाण करणाऱ्या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सूरज चव्हाणवर गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी धरणगावात महाविकास आघाडीतर्फे आंदोलन करण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, विधीमंडळात सर्वसामान्य जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा केली



जाते परंतु राज्याचे कृषीमंत्री मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याऐवजी विधीमंडळात "ऑनलाईन रमी" खेळण्यात व्यस्त असल्याचे चित्र संबंध महाराष्ट्राने व देशाने बघितलं. याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या छावा संघटनेचे विजय घाडगे पाटील आणि शेतकरी पुत्रांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे युवक अध्यक्ष सुरज चव्हाण तसेच त्याच्या कार्यकर्त्यांनी अमानुषपणे मारहाण केली. या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत अजित पवारांनी शेतकऱ्यांना साथ व कृषिमंत्र्यांना लाथ घातली पाहिजे असे मत उबाठा शिवसेनेचे उपनेते गुलाबराव वाघ यांनी व्यक्त केले. शेतकरी विरोधी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तसेच सूरज चव्हाण या दोघांवर भादंवि अंतर्गत ऑनलाईन जुगार खेळणे सर्वसामान्यांना मारहाण, धमकावणे या आशयाने गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी महाविकास आघाडी धरणगाव शहर व तालुक्याच्या वतीने पोलीस निरीक्षक सुनिल पवार यांना निवेदन देऊन करण्यात आली.